# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक
कालमर्यादित दिनांक : २२.३.२०१९.

क्रमांक : १०/एनजीपी/एआयसीटीई/२०१९-२०/ना-हरकत/ २७०
दिनांक : 13 MAR 2019

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून विद्यमान पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थेच्या साईट/ लोकेशन मध्ये बदल करणे, विद्यमान पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था बंद करणे, , पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे, इ. करीता शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्राबाबत...

संदर्भ : १. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रियेसाठी प्रसिध्द केलेली जाहिर सूचना [PUBLIC NOTICE FOR APPROVAL PROCESS 2019-20]
२. या संचालनालयाची जाहिर सूचना क्रमांक : २(३)/एनजीसी/मान्यता/२०१९/३५, दिनांक : १५.१.२०१९.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचेमार्फत संदर्भाधीन जाहिराती अन्वये शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता परीषदेमार्फत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या वेब पोर्टलवरील ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक २०१९-२० मधील मार्गदर्शक सूचनांनुसार आणि अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद (टेक्निकल इन्स्टिट्यूशनकरिता मान्यतेला मंजूरी) नियम, २०१६ चे विनियम व पहिली दुरुस्ती, २०१७ नुसार ऑन लाईन पध्दतीने दिनांक १४.१.२०१९ ते दिनांक ८.२.२०१९ या कालावधीत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्थांकडून अर्ज मागविण्यात आलेले होते. तसेच विद्यमान संस्थासाठी (एपीएच २०१९-२० च्या तरतूदींनुसार) दंड भरुन मान्यतेस मुदतवाढ मिळविण्यास ऑनलाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक १३.२.२०१९ हा निर्धारित केलेला होता.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता विद्यमान संस्थेच्या साईट/ लोकेशन मध्ये बदल करणे, विद्यमान संस्था बंद करणे, पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे, इ. बाबत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था परीषदेच्या सूचनेनुसार प्रस्ताव सादर केलेले आहेत, अशा संस्थांची तपासणी करण्यात आलेली आहे. सदर संस्थांनी सादर केलेल्या प्रस्तावांच्या अनुषंगाने शासनामार्फत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत शिफारस करण्याच्या दृष्टीकोनातून परिषदेमार्फत निर्धारित व खालील नमूद कागदपत्र या संचालनालयास सादर करावेत. नमूद कागदपत्र संचालनालयास सादर न केल्यास संचालनालयामार्फत अशा संस्थांना ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत शासनास शिफारस करण्यात येणार नाही ह्या बाबीची संबंधीत संस्थांनी नोंद घ्यावी.

१. संबंधीत संस्थेच्या अध्यक्ष / सचिव यांची स्वाक्षरीसह अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने प्रसिध्द केलेल्या ॲप्रुव्हल प्रोसेस हँडबुक २०१९-२० मध्ये विहित नमुन्यात संस्थेच्या ठरावाची मुळ प्रत.

२. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई यांचे शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता देण्यात आलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राची प्रत.

३. प्रवेशित विद्यार्थी किंवा नेमणुक केलेले कर्मचारी यांचे पर्यायी समायोजन कसे करणार याबाबतची कार्यपध्दती नमूद करुन याबाबत काही न्यायालयीन प्रकरण उध्द्भवल्यास त्यास तंत्रशिक्षण संचालनालय किंवा शासन जबाबदार राहणार नाही त्याची जबाबदारी पुर्णपणे संस्थेची राहील अशा आशयाचे १०० रु. च्या स्टॅंपपेपर वर संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता केलेल्या नोंदणीकृत हमीपत्राची मुळप्रत.

४. शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता संस्थेने सादर केलेल्या उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाचे नाहरकत प्रमाणपत्र मिळण्याबाबत विनंती पत्र.

५. शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता संस्थेने संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयास प्रस्ताव सादर करतांना भरलेल्या शुल्काच्या पावतीची प्रत.

६. संबंधित विद्यापीठाचे नाहरकत प्रमाणपत्राची प्रत.

७. संस्थेविरुध्द न्यायालयीन प्रकरणे, गंभीर दोषारोप, नियमांचे उल्लंघन, रॅगींग, तकारी इ. प्रकरणे प्रलंबित नसल्याबाबत रु. १००/- च्या स्टँपपेपर वर संस्थेने शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता केलेल्या नोंदणीकृत हमीपत्राची मुळप्रत.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या संदर्भ क्रमांक १ वरील जाहिरातीच्या अनुषंगाने संचालनालयाच्या संदर्भ क्रमांक २ वरील जाहीर सूचने अन्वये राज्यात शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता विद्यमान संस्थेच्या साईट/ लोकेशन मध्ये बदल करणे, विद्यमान संस्था बंद करणे, पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या संस्थेत पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे, इ. बाबत पदविका अभ्यासक्रमांच्या संस्था परीषदेच्या सूचनेनुसार प्रस्ताव सादर केलेले आहेत, अशा संस्थांची प्रस्तावांच्या अनुषंगाने तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय स्तरावर तपासणी करण्यात आलेली आहे. अशा संस्थांमार्फत शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबत खालील तक्त्यात नमूद संस्थांकडून संदर्भ क्रमांक २ वरील संचालनालयाच्या परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे संबंधीत संस्थेंच्या नावासमोर नमूद स्तंभ क्रमांक ४ मध्ये नमूद उपरोक्त अनुक्रमांकावरील कागदपत्र संचालनालयास सादर न केल्यामुळे सदर संस्थांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनास करावयाच्या शिफारशी संचालनालय स्तरावर प्रलंबित ठेवण्यात आलेल्या आहेत. सदर संस्थांची व संस्थानिहाय प्रस्तावातील त्रुटींची माहिती खालील प्रमाणे आहे.

१. Start Diploma Pharmacy Course in Existing Degree Pharmacy Institute for Academic Year २०१९-२०

| अ.क्र. | डीटीई कोड | संस्थेचे नाव | उपरोक्त नमूद मुद्यानुसार सादर करावयाचे कागदपत्रांचा अनुक्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | 2158 | Ramchandra Sanskritik Krida Mandal's R.D. Bhakt College of Pharmacy, Jalna, Daregaon, Jalna | **1,2,6** |
| 2 | 3205 | Bharati Vidyapeeth College of Pharmacy, Belapur, Navi Mumbai, Sector 8, C.B.D, Belapur, Dist Thane | **1,2,6** |
| 3 | 3233 | Govindrao Nikam College Of Pharmacy, Sawarde, Sawarde (Wahalphata) Tal. Chiplun Dist. Ratnagiri | **1,2,6** |
| 4 | 3236 | Konkan Gyanpeeth Rahul Dharkar College of Pharmacy & Research Institute, Karjat, Dahivali, Karjat Dist. Raigad, Vengaon Road, Dahivali, Karjat, Dist. Raigad | **1,2,6** |
| 5 | 4199 | S.Patil Shikshan Sanstha's Smt. Kishoritai Bhoyar College of Pharmacy,Kamptee, Behind Railway Station, New Kamptee, Nagpur | **1,2,6** |
| 6 | 4213 | Mahila Vikas Sanstha, Dr. R.G. Bhoyar Institute of Pharmaceutical Education & Research, Wardha, Bachelor Road, Nalwadi, Wardha | **1,2,6** |
| 7 | 5193 | Mula Education Society's College of Pharmacy.Sonai, A/P Sonai Tal Newasa Dist-Ahmednagar | **1,2,6** |
| 8 | 5195 | Sanjivani Rural Education Society's Sanjivani College of Pharmaceutical & Research, Kopargaon, At -Sahajanandnagar , Post-Shingnapur Tal Kopargaon Dist. Ahmednagar | **1,2,6** |
| 9 | 5443 | Divine College of Pharmacy, Satana, Nampur Road, Satana, Taluka Satana, Dist Nashik | 1,2,6 |

| अ.क्र. | डीटीई कोड | संस्थेचे नाव | उपरोक्त नमूद मुद्यानुसार सादर करावयाचे कागदपत्रांचा अनुक्रमांक |
|---|---|---|---|
| 10 | 5448 | Shri. Vile Parle Kelawani Mandal's Institute of Pharmacy, Dhule, Survey No. 499/1, Plot No.3, Behind Gurudwara, Mumbai Agra Highway, Dhule | **1,2,6** |
| 11 | 6364 | Progressive Education Society's Modern College of Pharmacy( for Women), Moshi.(Tal.Haveli), Boradewadi, Dehu Alandi Road, At Post - Mashi Tal - Haveli, Dist- Pune | **1,2,6** |
| 12 | 6372 | Poona District Education Association's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy , Saswad, Pune, A/P. Saswad, Tal. - Purandar, Pune , 412301 | **1,2,6** |
| 13 | 6375 | Dr. D.Y.Patil Instiute of Pharmceutical Science & Research,Pimpri, Pune , Dr. D.Y.Patil Education Complex, Opp H A Factory,Pimpri, Pune 411018 | **1,2,6** |
| 14 | 6383 | Kasturi Shikshan Sansthas College of Pharmacy, Shikrapur, Gut No. 87, Post: Shikrapur Tal : Shirur Dist : Pune 411001 | **1,2,6** |
| 15 | 6384 | Genba Education Trust, Genba Sopanrao Moze College of Pharmacy, Wagholi, Gat No. 2181, Wagholi, Taluka Haveli Dist. Pune 412207 | **1,2,6** |
| 16 | 6393 | Samarth Education Trust Arvind Gavali college of Pharmacy, Satara, S. No. 261 At Jaitapur, Satara Rahimatpur Road Tal . Satara 415004 | **1,2,6** |
| 17 | 6820 | Adarsh College of Pharmacy, Vita Dist. Sangli, Bhavani Nagar, Kundal Road, Vita, Tal. khanapur, dist. Sangli, Maharashtra 415311 | **1,2,6** |
| 18 | 6833 | Dattakala College of Pharmacy, Chincholi, Daund, Gat No. 541/2, 527, Off. Pune-Solapur High way, A/P swami chincholi, Tal.Daund, Pune | **1,2,6** |

२. Change of Site / Location of Institute from Academic Year २०१९-२०

| अ.क्र. | डीटीई कोड | संस्थेचे नाव | उपरोक्त नमूद मुद्यानुसार सादर करावयाचे कागदपत्रांचा अनुक्रमांक |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1 | 4610 | Jainuddin Zaweri Polytechnic, Tukum, Chandrapur | **1,3,4** |

३. Closure of institutes for Academic Year २०१९-२०.

| अ.क्र. | डीटीई कोड | संस्थेचे नाव | ट्रस्ट / सोसायटीचे नाव | उपरोक्त नमूद मुद्यानुसार सादर करावयाचे कागदपत्रांचा अनुक्रमांक |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | | 4 |
| 1 | 1186 | Balaji Polytechnic, Sawarla, Post-Kona, Tal.-Wani, Dist. Yavatmal | Balaji Patil Chopane Samajik & Shaikshanik Sanstha, Sawarla, Auradha, Pragati Nagar, Station Road, Wani, Tal. Wani, Dist. Yavatmal. | **2,3,4,5,7** |
| 2 | - | Nav Vidya Niketan Institute of Technology, NVNS Campus, India Naka, Mardi Road, Amravati | Nav Vidya Niketan Shiksha Sanstha, Plot No. 10, State Bank Colony, Ambika Nagar, Amravati | **1,2,3,4,7** |
| 3 | 2198 | Nutan Vidya Samiti, Sitaramji Mundada Marathwada Polytechnic, Khandoba Bazar, Parbhani 431401 | Nutan Vidya Samittee's, Sitaramji Mundada Marathwada Polytechnic, Khandoba Bazaar, Parbhani-431401 | **1,2,3,4,5,7** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | 2535 | D.B.Group of Instituions, School of Technology, At.Mahalangra, Tal.Chakur,Latur | Radheya Charitable Trust's D. B. Group of Institutions school of Technology (Polytechnic) Latur-Nanded Highway, Mahalangra village, Tq. Chakur, Dist. Latur. | 2,3,4,7 |
| 5 | 2288 | Kai Haribhai Varpudkar Gramin Mahila Sevabhavi Sanstha's LATE. HARIBAI WARPUDKAR POLYTECHNIC, PARBHANI | Kai Haribhai Varpudkar Gramin Mahila Sevabhavi Sanstha's Gut No 104,Karegaon Vasmat road Opp.Water filter Plant ParbhaniLate Haribai Varpudkar Poly Parbhani , 431401 | 1,2,4,5,7 |
| 6 | 2540 | Ratneshwari Institute of Polytechnic, At Post Vishnupuri, Near by SRTMU University, Latur-Nanded Highway, Nanded. | Ratneshwari Institute of Polytechnic, At Post Vishnupuri, Near by SRTMU University, Latur-Nanded Highway, Nanded. | 1,2,3,4,5,7 |
| 7 | 3284 | Prabhakar Patil Education Society's Polytechnic S.No. 54A At- Bhilavale, Post- Wavandal, Tal-Khalapur Dist-Raigad | Prabhakar Patil Education Society's Tal- Alibaug, Dist:-Raigad | 2,3,4,5,7 |
| 8 | 3272 | Dr. D.Y.Patil Polytechnic, Nerul, Navi Mumbai | RAMRAO ADIK EDUCATION SOCIETY ADD: Worli, Mumbai | 1,2,4,7 |
| 9 | 3265 | Hyderabad (sind) National Collegiate Board. Kishinchand Chellaram College Building, Vidyasagar Principal K.M. Kundanani Chowk, 124, Dinshaw Wachha Road, Churchgate, Mumbai 400020 | Smt. S. H. Mansukhani Institute of Technology Smt. Chandibai Himathmal Mansukhani Road, CHM Campus, Opposite Railway Station, Ulhasnagar-421003 | 1,2,3,4,7 |
| 10 | 4252 | Advoot Diploma College of Engineering,Kuhi | Late Madhukarrao Deshmukh Education Society ,Kuhi | 1,2,3,4,7 |
| 11 | 4237 | KDK Polytechnic Umrer,S H No.9,Opp. WCL ,Umrer-441204 | Backward Class Youth Relif Committee Rajvilla,Khamla Road Nagpur. | 1,2,3,4,7 |
| 12 | 4224 | Shri Datta Meghe Polytechnic, Hingna Road,Wanadongri,Nagpur-441110 | Nagar Yuwak Shikshan Sanshta Nagpur.0712-2249462 | 1,2,3,4,5,7 |
| 13 | 4236 | Om Polytechnic, Samata Nagar,Master colony,Sawangi Meghe, Wardha-442001 | Om Arunodayya Bahuudeshiya Khadi Gramodyog Vikas Sanstha, Suraj Bhawan,Near Sai Mandir Road,Wardha, M.S. 442001 | 1,2,3,4,7 |
| 14 | 5250 | G H RAISONI POLYTECHNIC, GAT NO 269, NEAR SHANBAG VIDYALAY, AT POST SAVKHEDA (BK), JALGAON, JALGAON, MAHARASHTRA PIN 425002 | G H R EDUCATION FOUNDATION SOCIETY SHRADDHA HOUSE, 345, KINSWAY, NAGPUR, NAGPUR, | 1,2,3,4,7 |
| 15 | 5355 | Maharashtra shetkari Sevamandal Traymbakrao Shejwal Institute of Technology (Polytechnic),Manmad RDC, Anakwade,Manmad. Tal-Nandgaon,Dist-Nashik. | Maharashtra Shetkari Sevamandal opp:ITI,Camp No.2 Manmad | 1,2,3,4,7 |
| 16 | 5225 | Shree Sant Muktabai Institute of Technology, Jalgaon (Polytechnic) Bhikamchand Jain Nagar, Pimprala Road, Jalgaon 425001 | Shree Sant Muktabai Sansthan, Muktainagar (Edlabad) New Muktabai Temple Tal-Muktainagar Dist- Jalgaon | 1,2,3,4,5,7 |
| 17 | 5431 | Shri Sai Institute of Technology, Gat no 15/1, Devgaon Devli, Tal. Amalner, Dist Jalgaon | Vidyadevi Saraswati Shaikshanik Pratishthan, Dhule, Gat no 15/1, Devgaon Devli, Tal. Amalner, Dist Jalgaon | 1,2,3,4,7 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 18 | 5271 | Shree Sant Muktabai Institute of Technology, Jalgaon (Pharmacy) Bhikamchand Jain Nagar, Pimprala Road, Jalgaon 425001 | Shree Sant Muktabai Sansthan, Muktainagar (Edlabad); New Muktabai Temple Tal-Muktainagar Dist- Jalgaon | **1,2,3,4,5,7** |
| 19 | 6720 | Ashokrao Mane Polytechnic, Ambap, Tal-Hatmanangle, Dist-Kolhapur-416112 | Shri Balasaheb Mane Shikshan Prasarak Mandal, Ambap, Tal-Hatkanangle, Dist-Kolhapur-416112 | **1,2,3,4,7** |
| 20 | 6412 | Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal's Polytechnic, Barshi, 205, 823/1, Karmaveer Nagar, Barshi, Dist. Solapur-413411 | Shri Shivaji Shikshan Prasarak Mandal, Barshi, Karmaveer Nagar, Barshi, Dist. Solapur-413411. | **1,2,3,4,7** |
| 21 | 6476 | Late Narayandas Bhawandas Chhabada Institute of Engg. & Tech. (Polytechnic), Raigaon at Survey No. 259, A/P-Raigaon, Tal-Jaoli, Dist Satara-415020 | Sou. Devibai Narayandas Chhabada Rural Education Society, Satara, Plot No. 30, Gulmohor Colony, Opp. To ITI, Gendamal, Satara, PH. 02162-250400, 250992, 93 | **1,2,3,4,7** |
| 22 | 6411 | Dr. J.J. Magdum Polytechnic, Jaysingpur, Shirol Wadi Road, Jaysingpur-416101. | Dr. J.J. Magdum Trust, Jaysingpur | **1,2,3,4,7** |
| 23 | 6526 | MAEER's, MIT Polytechnic, Pune, No. 124, M.I.T Campus, Paud Road, Kothrud, Pune – 411 038. | MAHARASHTRA ACADEMIC OF ENGINEERING AND EDUCATION RESEARCH'S PUNE, s. No. 124, M.I.T Campus, Paud Road, Kothrud, Pune – 411 038. | **1,3,4,5,7** |

तरी, संबंधीत संस्थांनी संचालनालयाच्या सदर परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे त्यांच्या नावासमोर नमूद उपरोक्त तक्त्यातील नमूद अनुक्रमांकावर, नमूद केलेले कागदपत्र दिनांक २२.३.२०१९ पर्यंत संचालनालयास सादर करावेत अन्यथा संचालनालयामार्फत सदर संस्थांच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबतच्या शिफारशी शासनास सादर करणे शक्य होणार नाही व होणाऱ्या विलंबाची व पुढील परिणामांची संपुर्ण जबाबदारी संबंधीत संस्थेची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ. सुभाष महाजन)
सहसंचालक, तंत्रशिक्षण, म.रा.,मुंबई

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती/ औरंगाबाद/ मुंबई/ नागपूर/ नाशिक/ पुणे त्यांना कळविण्यात येते की, सदर बाब आपल्या अखत्यारीतील उपरोक्त प्रस्ताव सादर केलेल्या संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.
२. कार्यासन क्रमांक ३ (आयटीसेल), मुख्य कार्यालय, मुंबई (सदरचे परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.)
३. निवडनस्ती.

ALL INDIA COUNCIL FOR TECHNICAL EDUCATION
(A STATUTORY BODY OF THE GOVERNMENT OF INDIA)
Nelson Mandela Marg, Vasant Kunj, New Delhi – 110067
Ph. No.: 011-26131578, 011-26131580, 011-29581000 Website: www.aicte-india.org

## PUBLIC NOTICE FOR EXTENSION OF LAST DATE FOR APPLICATION FOR APPROVAL 2019-20

In continuation of the Public Notice for the Approval Process 2019-20 Advt. No. Approval/01(01)/2019 issued for the said purpose for the academic session 2019-20, for Technical Institutions offering Technical Programmes in Engineering and Technology/ Pharmacy/ Architecture/ Planning/ Applied Arts and Crafts/ Design/ Hotel Management and Catering Technology/ MCA/ Management at Diploma/ Post Diploma Certificate/ Under Graduate Degree/ Post Graduate Diploma/ Post Graduate Degree Levels affiliated to University/ Board or Standalone Institutions, based on the requests from several Institutions for extending the last date, it is hereby notified that the last date for submission of online application for approval of **New Institutions/ Extension of Approval for the existing Institutions is extended up to 8th February, 2019 without penalty**.

The last date for submission of online application with penalty (as per the provisions of APH 2019-20) for Extension of Approval based on self-disclosure **for existing Institutions only** is permitted up to **13th February, 2019. It may be noted that there will be no further extension of date under any circumstances.**

Member Secretary, AICTE

**Advt. No: Approval/**

(5)

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दुरध्वनी - 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स - 22692102.
E-mail : desk2@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in

जाहीर सूचना

क्रमांक: २(३)/एनजीसी/मान्यता/२०१९/३५
दिनांक : १५ जानेवारी, २०१९

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली (AICTE) यांनी सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षाकरीता मान्यता प्रक्रीयेसाठी प्रसिध्द केलेल्या जाहीर सूचनेद्वारे [PUBLIC NOTICE FOR APPROVAL PROCESS 2019 - 20] एआयसीटीई ॲप्रुव्हल प्रोसेस हॅंडबुक २०१९-२० मधील मार्गदर्शक सूचनेच्या आधारे ऑन लाईन पध्दतीने अर्ज दिनांक १४.०१.२०१९ ते दि. ०३.०२.२०१९ पर्यंत व विद्यमान संस्थासाठी (एपीएच २०१९-२० च्या तरतूदींनुसार) दंड भरून मान्यतेस मुदतवाढ मिळविण्यास ऑन लाईन अर्ज सादर करण्याचा शेवटचा दिनांक ०८.०२.२०१९ हा निर्धारीत केलेला आहे. त्यानुसार व्यावसायिक अभ्यासक्रमासंदर्भात परिषदेस केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने या संचालनालयाच्या संकेतस्थळावर माहिती भरण्याकरीता http://www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी निर्धारीत केलेल्या वेळापत्रकानुसार लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. त्यासाठी विद्यमान संस्थांनी संचालनालयाने दिलेला संकेतांक व पासवर्ड द्वारे लॉगइन करुन दि. ०३.०२.२०१९ पर्यंत व AICTE यांचेकडे दंड भरुन मान्यतेस विस्ताराबाबत सादर केलेल्या अर्जाची माहिती दि ०८.०२.२०१९ पर्यंत भरून, भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करण्यात यावी. तसेच शैक्षणिक वर्ष २०१९-२०. पासून विद्यापीठांशी / मंडळाशी संलग्न पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका इ. स्तरावर अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र/ वास्तुशास्त्र / हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी/ मॅनेजमेंट / एम.सी.ए. या व्यावसायिक तांत्रिक अभ्यासक्रमाच्या नविन तांत्रिक शिक्षण संस्था सुरू करणा-या संस्थानी संचालनालयाच्या संकेतस्थळावर नवीन नोंदणी करुन त्याअनुषंगाने आवश्यक ती माहिती भरून, भरलेल्या माहितीची निश्चिती [Confirm] करावी.

२. विद्यमान व शै.व. २०१९-२० पासून नव्याने सुरू होणा-या संस्थानी दि. २२.०२.२०१८ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेले नोंदणी शुल्क सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे अदा करण्यात यावे. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीची साक्षांकीत प्रत सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये यांचेकडे सादर करतांना प्रस्तावासोबत जोडण्यात यावी.

३. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली व वास्तुकला परिषद, नवी दिल्ली यांना केलेल्या खालील प्रकारच्या अर्जाच्या अनुषंगाने प्रत्यक्ष तपासणी करण्यात येणार आहे.

i. शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून विद्यापीठ / मंडळ संलग्न पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका स्तरावर अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र/ वास्तुशास्त्र / हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी/ मॅनेजमेंट / एम.सी.ए. हे व्यावसायिक तांत्रिक अभ्यासक्रमाच्या नविन तांत्रिक शिक्षण संस्था सुरू करणे.

ii. एमसीए / एमबीए अभ्यासक्रम संचलित करणा-या बिगर तांत्रिक संस्थानी नवीन तांत्रिक संस्था म्हणून अर्ज करणे

iii. विद्यमान संस्थेच्या साईट / लोकेशन मध्ये बदल करणे.

iv. पदविका पातळीच्या संस्थेचे पदवी पातळीच्या संस्थेत रुपांतरण आणि त्याउलट करणे.

v. विद्यमान संस्थेत नवीन विद्याशाखा (Programme) / स्तर (Level) सुरू करणे.

vi. एकाच व्यवस्थापनामार्फत सुरू असलेल्या एका परिसरातील संस्था विलिन करणे [Mergering]

vii. महिला संस्थेचे को-एज्युकेशन मध्ये परिवर्तन व त्याउलट

viii. विद्यमान संस्था बंद करणे

ix. विद्यमान संस्था बंद करून तेथे नवीन व्यावसायिक अभ्यासक्रमाची संस्था सुरू करणे

x. ट्रस्ट / सोसायटी / कंपनीच्या नावात बदल करणे

वरील अर्जाची प्रत (Hard Copy) संबधित संस्थांनी AICTE च्या ऑन लाईन पध्दतीने सादर केलेल्या दिनांकाच्या दुस-या किंवा दिनांक ०३.०२.२०१९ यापैकी जे अगोदर असले त्या दिनांकास सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे सादर करावा. याबाबत विभागीय कार्यालयाकडे शासनाने विहित केलेले नोंदणी शुल्क भरल्यानंतर पुढील औपचारीक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. तसेच वरील प्रस्ताव सहसंचालक, तंत्र शिक्षण,विभागीय कार्यालये सादर करतांना संबंधित प्रस्तावावर ठळक अक्षरात "----------------------" (प्रस्तावाचा विषय) **नमूद करावा.**

४. परिच्छेद क्रमांक ३(i) व ३ (ii) समोर नमूद केलेल्या प्रस्ताव / अर्जाच्या अनुषंगाने या संचालनालयात सुनावण्या घेण्यात येतील. सुनावण्यांचे वेळापत्रक स्वंतत्रपणे या संचालनालयाच्या संकेतस्थळी प्रसिध्द करण्यात येईल.

५. अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी संदर्भीन जाहिर सूचनेत नमूद केलेल्या अर्जापैकी परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद केलेले अर्जाव्यतिरीक्त उर्वरीत अर्जाची माहिती संचालनालयाच्या संकेत स्थळी उपलब्ध करून दिलेल्या पोर्टलवर भरणे अनिवार्य राहील. सबब सर्व संबंधित संस्थाना कळविण्यात येते की, याबाबतची माहिती संचालनालयाचे संकेतस्थळावरील पोर्टलवर भरुन अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेस सादर केलेल्य प्रस्तावाची हार्ड कॉपी व नोंदणी शुल्क अदा केल्याच्या पावतीच्या प्रतीसह (मुखपृष्ठावर संस्थेचे नांव व डीटीई संकेतांकासह), सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचेकडे जमा करण्यात यावी.

६. शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीताच्या मान्यतेसाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांना ऑन लाईन सादर केलेल्या अर्जाची माहिती या संचालनालयाने http://www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळी उपलब्ध करून दिलेल्या लिंक वरती माहिती भरणे अनिवार्य राहील अन्यथा अशा संस्थाच्या अर्जाच्या अनुषंगाने शासनाचे स्तरावरील औपचारीक कार्यवाही संचालनालय स्तरावरुन करण्यात येणार नाही याची त्यांनी नोंद घ्यावी. तसेच याबाबत संबंधित संस्थाना काही अडचणी आल्यास त्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालयाशी संपर्क साधावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत,

१. सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय, मुंबई, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर

त्यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत प्रकरणी दि. २२.०२.२०१८ अन्वये शासनाने निर्धारीत केलेले नोंदणी शुल्क संबंधित संस्थाकडून घेण्यात यावे. तसेच परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या प्रस्तावाबाबत AICTE ने APH २०१९-२० मध्ये निर्धारीत केलेल्या मानकांनुसार प्रत्यक्ष तपासणी करुन त्याबाबतचा अहवाल संबंधित संस्थानी परिषदेस सादर केलेल्या प्रस्तावाच्या दिनांकापासून २ दिवसांचे आत खास दुतामार्फत या संचालनालयास सादर करावेत.

२. सिस्टीम मॅनेजर, कार्यासन क्रमांक ३ (संगणक कक्ष), तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई.

३. सर्व संबंधित संस्था (संबंधित सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालये यांचे मार्फत)

d:\d data\kedare\approval process 2019\notification 2019_2.docx